MHRG031904562025

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१५८/२०२५**

**श्री.चेतन रामनाथ नाईक**

**विरुध्द**

**मांडवा सागरी पोलीस ठाणे, रायगड**

## निशाणी १ वरील आदेश

सदरचा अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

०२. अर्जाचे अवलोकन केले. अर्जदाराचे थोडक्यात कथन की, अर्जदार यांच्या इंडियन बँक, खाते क्र. ६७३७५५९२६४, शाखा–नवीन पनवेल या खात्यातुन दि.११/०२/२०२४ ते दि.२८/०२/२०२४ पर्यंत तसेच दि.२९/०२/२०२४ रोजी अर्जदार यांचे स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा–अलिबाग येथील खात्यातुन एकूण रक्कम रु. ०६,१०,०५०/– (सहा लाख दहा हजार पन्नास रु.मात्र) एवढी रक्कम इंटरनेट बँकिंग संबंधी फ्रॉड होऊन अर्जदार यांनी कोणतेही हस्तांतर केले नसताना स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ४२६७५२३५०८०, शाखा–इंदोर या खात्यात जमा झाले. त्यानंतर अर्जदार यांनी सायबर क्राईम तक्रार क्रमांक २१९०३२४००१९४३८ अन्वये तक्रार दाखल केली. त्या अनुशंगाने सदर तक्रार मांडवा सागरी पो.ठाण्याकडे प्राप्त झाल्याने त्यांनी सदर स्टेट बँक ऑफ इंडिया, खातेधारक– जय बालाजी ट्रेडर्स, खाते क्र.

४२६७५२३५०८०, शाखा–इंदोर या खात्यातील एकूण रक्कम रु. ३,०९,८००/– (तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) एवढी रक्कम फ्रिझ केली. सदर होल्ड झालेली रक्कम परत मिळणेकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांनी सदरची रक्कम तपासाकामी न्यायालयाच्या आदेशान्वये वेळोवेळी हजर करतील व न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अटी शर्तीचे पालन करतील असे कथन केले आहे.

०३. सरकारी वकील यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार यांची ज्या खात्यामध्ये रक्कम होल्ड करण्यात आलेली आहे त्या खात्यातील रक्कम अर्जदाराव्यतिरिक्त अन्य व्यतींची असण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सदरचा अर्ज नामंजुर व्हावा अशी विनंती केली आहे.

०४. सदर अर्जाच्या अनुशंगाने मांडवा सागरी पो.ठाणे कडील तपासिक अंमलदार यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार यांनी ऑनलाईन सायबर पोर्टल तक्रार क्र.२१९०३२४००१९४३८ अन्वये दिलेल्या तक्रारी अर्जान्वये त्यांनी त्यांच्या खात्यामधुन स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ४२६७५२३५०८०, शाखा–इंदोर या खात्यामध्ये टप्याटप्याने एकूण रक्कम रु. ३,०९,८००/– (तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) एवढी रक्कम हस्तांतरित झाली आहे. परंतु अर्जदार यांना मोबाईल नंबरवर प्राप्त लिंकवरुन त्यांच्या खात्यात एकुण रक्कम रु.०६,१०,०५०/– (सहा लाख दहा हजार पन्नास रु.मात्र) एवढी रक्कम दिसत होती. अर्जदार यांची फ्रॉडव्दारे हस्तांतरित झालेली एकूण रक्कम रु. ३,०९,८००/– (तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) ही होल्ड करण्यात आली असुन सदर

होल्ड रक्कम अर्जदार यांना देण्यास हरकत नसलेबाबत म्हणणे दाखल केले आहे.

०५. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराची ऑनलाईन पध्दतीने एकूण रक्कम रु. ३,०९,८००/- (तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) ची फसवणुक झालेली आहे. अर्जदार यांनी अजुन गुंतवणुक करावी या उद्देशाने फसवणुक करणा-या व्यक्तीने अर्जदार यांना मोबाईलवर लिंक पाठवुन त्याव्दारे अर्जदार यांच्या खात्यात एकुण रक्कम रु.०६,१०,०५०/- (सहा लाख दहा हजार पन्नास रु.मात्र) इतकी रक्कम असल्याचे भासवले. तसेच सायबर क्राईम तक्रार क्रमांक-२१९०३२४००१९४३८ चे अवलोकन करता असे दिसुन येते की, अर्जदार यांच्या खात्यातुन एकूण रक्कम रु. ३,०९,८००/- (तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) इतकीच रक्कम फ्रॉड होऊन हस्तांतरित झाल्याचे दिसत आहे. परंतु अर्जदार हे त्यांची एकुण रक्कम रु.०६,१०,०५०/- (सहा लाख दहा हजार पन्नास रु.मात्र) इतक्या रकमेची मागणी करत आहेत.

०६. अर्जदाराने सदर अर्जाबरोबर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, अर्जदाराने त्यांच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-अलिबागच्या खात्याच्या पासबुकची व्हेरिफाईड प्रत दाखल केली आहे. त्यावरुन खाते क्र. ४२३६४६८४०५२ हे अर्जदाराचे आहे असे दिसून येते. सदर रकमेबाबत आजतागायत कोणीही मागणी केलेली नाही. तसेच तपासी अंमलदाराच्या म्हणण्यानुसार सायबर पोर्टल तक्रार ॲकनॉलेजमेंट क्रमांक-२१९०३२४००१९४३८ अन्वये होल्ड केलेली रक्कम रु.

३,०९,८००/- (तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) इतकी अर्जदारांना देण्यास कोणतीही हरकत नाही.

०७. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ५०३ चे अवलोकन केले असता ज्यावेळी कोणतेही पोलीस अधिकारी यांनी संपत्तीचे अधिग्रहण केल्याची कृती या संहितेच्या उपबंधाखाली दंडाधिकारी यांना कळविण्यात आली असेल व चौकशी किंवा संपरिक्षेत अशी संपत्ती फौजदारी न्यायालयात आणली गेली नसेल तेंव्हा अशा संपत्तीची विल्हेवाट करणे किंवा तिच्या कब्जास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे तिची सुपुर्तगी करणे याबाबत दंडाधिकारी आदेश देऊ शकतो. अशा परिस्थितीत सदर होल्ड केलेली रक्कम अर्जदारास देणे भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ५०३ अन्वये योग्य होईल. तसेच सदर रक्कम देते वेळी अर्जदारावर योग्य त्या अटी व शर्ती पारित करणे न्यायोचित आहे.

०८. अर्जदार सदर अर्जान्वये रक्कम रु.०६,१०,०५०/- (सहा लाख दहा हजार पन्नास रु.मात्र) त्याला परत मिळावे अशी मागणी करत आहे. परंतु, प्रत्यक्षात अर्जदाराची रक्कम रु.३,०९,८००/- (तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) इतक्याच रकमेची फसवणुक झाल्याचे दिसुन येते. अर्जदाराला फसवणुक करणा-या व्यक्तीने मोबाईलवर लिंकव्दारे असे भासवले की, त्याने गुंतवणुक केलेले रु.३,०९,८००/- (तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) हे रक्कम रु. ०६,१०,०५०/- (सहा लाख दहा हजार पन्नास रु.मात्र) झाले आहेत. परंतु ही सायबर गुन्हेगारांची निष्पाप लोकांना अधिक लोभ दाखवण्याची रित आहे. प्रत्यक्षात रक्कम रु.३,०९,८००/- (तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) इतक्याची अर्जदाराची फसवणुक झाली आहे व सदर रक्कम सायबर पोलीसांनी फ्रिज

केली आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदाराची ऑनलाईन पध्दतीने त्यांच्या खात्यामधुन फ्रॉड झालेली रक्कम रु. ३,०९,८००/- (तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) व सायबर पोर्टलव्दारे स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-इंदोर, खाते क्र. ४२६७५२३५०८० या खात्यामध्ये होल्ड केलेली रक्कम रु. ३,०९,८००/- (तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) ही अर्जदाराच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ४२३६४६८४०५२, शाखा-अलिबाग या खात्यात खालील अर्टी व शर्तीवर देत आहे. सबब खालील आदेश.

## आदेश

०१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

०२. व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-इंदोर, यांनी आपल्या बँकतील खाते क्र.४२६७५२३५०८० या खात्यावर फ्रीज होल्ड असलेली रक्कम रु. ३,०९,८००/-(तीन लाख नऊ हजार आठशे रु.मात्र) ही अर्जदार नामे चेतन रामनाथ नाईक, वय-२९ वर्षे, रा.सारळ, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ४२३६४६८४०५२, शाखा-अलिबाग, या खात्यात वर्ग करावी व सदर खात्यात रक्कम वर्ग होईपावेतो उपरोक्त नमुद स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-इंदोर यांनी आपल्या बँकेतील खाते क्र.४२६७५२३५०८० पूर्ववत सुरु करावे व सदर रक्कम अर्जदार यांचे उपरोक्त नमुद खात्यामध्ये वर्ग झाल्यानंतर पुन्हा सदर खाते हे तपासी अधिकारी मांडवा सागरी पो.स्टेशन, अलिबाग यांना आवश्यक आहे तोपर्यंत फ्रिज करण्यात यावे व

त्याबाबत पोलीस निरीक्षक, मांडवा सागरी पो. स्टेशन, ता.अलिबाग यांना लेखी कळवावे.

०३. अर्जदार यांच्या खात्यामध्ये सदरची रक्कम ही अंतरिम स्वरुपात वर्ग झालेली असणार आहे याची अर्जदार याने नोंद घ्यावी. तसेच, सदरची रक्कम अर्जदार याचे खात्यात अंतरिम स्वरुपात वर्ग झाल्यानंतर अर्जदार याने पोलिस निरीक्षक, मांडवा सागरी पोलीस स्टेशन, ता.अलिबाग यांना रक्कम रु.३,५०,०००/-(तीन लाख पन्नास हजार रु.मात्र)चे बंधपत्र लिहुन दयावे.

०४. अर्जदार याने उपरोक्त नमुद रक्कम त्याचे खात्यामध्ये अंतरिम स्वरुपात वर्ग झाल्यानंतर त्याचे स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र.४२३६४६८४०५२, शाखा-अलिबागचा प्रमाणित केलेला संगणकीय खाते उतारा पोलीस निरीक्षक, मांडवा सागरी पो.स्टेशन यांच्याकडे बंधपत्रासोबत जमा करावा.

०५. न्यायालय आदेश देईल त्या-त्या वेळी अर्जदार याने सदरची अंतरिम स्वरुपात वर्ग करण्यात आलेली रक्कम न्यायालयासमक्ष हजर करावी.

०६. सदर अंतरिम स्वरुपात वर्ग करण्यात आलेल्या रकमेबाबत न्यायालयाने दिलेल्या प्रत्येक आदेशाचे अर्जदार याने काटेकोरपणे पालन करावे.

०७. वरील अटी व शर्तींचा अर्जदार याचेकडुन भंग झाल्यास त्याचे बंधपत्र जप्त करण्यात येईल व त्याचेकडुन बंधपत्रातील रक्कम वसुल करण्यात येईल.

०८. सदर गुन्हयाचा तपास अधिका-यांना आदेश देण्यात येतो की, त्यांनी सदर अंतरिम स्वरुपात वर्ग करण्यात आलेल्या रकमेबाबतच्या कागदपत्रांचा सविस्तर पंचनामा तयार करुन तो दोषारोपपत्रासोबत दाखल करावा.

०९. सदर आदेशाची प्रत मुळ खटल्यासोबत ठेवावी.

१०. याबाबत संबंधित पोलीस ठाण्यात यादी पाठवावी.

ISHA MEENAKSHEE GHATGE

Digitally signed by ISHA MEENAKSHEE GHATGE
Date: 2026.02.17 10:46:19 +0530

अलिबाग, ( ईशा व्ही. घाटगे )

दि.१६/०२/२०२६ दुसरे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अलिबाग–रायगड